# पंचोपचार आणि षोडशोपचार पूजनामागील शास्त्र

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )


- मनोगत ८
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य १०
- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ १२
- संकलकांचा परिचय १३
- काही आध्यात्मिक संज्ञांचा अर्थ १४

**प्रकरण १ : देवपूजेची सर्वसाधारण माहिती**

* देवपूजेची व्याख्या, निर्मिती व महत्त्व १५
* देवपूजेचे प्रकार : पंचोपचार, षोडशोपचार, मानसपूजा व परापूजा १७
* काही देवतांच्या पूजनाची वैशिष्ट्ये व त्यांमागील कारण १७
* देवपूजा दिवसात किती वेळा व कोणत्या समयी करावी ? १९
* देवपूजा कधी करू नये ? २०
* देवपूजा कोणत्या दिशेला व कोणी करावी ? २१

**प्रकरण २ : पंचोपचार पूजन - कृती आणि शास्त्र**

**१. पंचोपचार पूजनाची कृती** २६
  १ अ. कर्मकांडाच्या स्तरावरील पूजा २६
  १ आ. भावाच्या स्तरावरील पूजा ३०
**२. पंचोपचार पूजनातील कृतींमागील शास्त्र** ३२
* देवतेला अनामिकेने (करंगळीशेजारच्या बोटाने) गंध का लावावे ? ३४
* देवतांना फुले वहातांना ती विशिष्ट संख्येत व रचनेत का वहावीत ? ४२
* देवतेला किती उदबत्त्यांनी ओवाळावे ? ५२
* देवतेला आधी धूप, नंतर उदबत्ती व त्यानंतर दीप का दाखवतात ? ५५

* देवाला नैवेद्य दाखवतांना तुळशीच्या पानाचा वापर का करावा ? ६०
**३. पंचोपचारांचे तुलनात्मक महत्त्व व त्यांचे परिणाम** **६८**
**४. देवपूजेत पंचोपचार असतांनाही अक्षता का वहातात ?** **६८**

**प्रकरण ३ : षोडशोपचार पूजन - कृती आणि शास्त्र**

**१. षोडशोपचार पूजनाची कृती** **७०**
**२. षोडशोपचार पूजनातील कृतींमागील शास्त्र** **७५**
* देवाला आवाहन करतांना मूर्तीवर अक्षता/तुळशीदल का वाहातात ? ७५
* विविध देवतांना द्यावयाची विविध आसने कोणती ? ७६
* अर्घ्य देतांना पाण्याबरोबर गंध, पुष्प व अक्षता का वाहातात ? ७७
* आचमन करण्यासाठी कापराने सुगंधित केलेले जल का वापरावे ? ७८
* देवाला अभिषेक करतांना सुगंधी द्रव्याचा वापर का करावा ? ८१
* पूजेत देवतेला दोन वस्त्रे का व कशी अर्पण करावीत ? ८१
* पूजेअंती देवाची क्षमायाचना करण्याचे महत्त्व काय ? ८३
**३. षोडशोपचार व पंचोपचार पूजा** **८३**
**४. षोडशोपचार पूजेतील सोळा उपचारांचे तुलनात्मक महत्त्व, परिणाम व वैशिष्ट्ये** **८५**

**प्रकरण ४ : देवपूजा झाल्यानंतर करावयाच्या कृती आणि त्यांमागील शास्त्र**

* तीर्थ प्राशन करतांना हाताची मुद्रा कशी असावी ? ८८
* नैवेद्य व प्रसाद यांची तुलना ८९

**प्रकरण ५ : अन्य माहिती**

**१. देवघरात छोट्या तांब्यात पाणी भरून ते दुसऱ्या दिवशी प्यावे, हे तत्त्वतः योग्य असले, तरी कलियुगासाठी अयोग्य असणे** **९३**
**२. मानसपूजा : व्याख्या, महत्त्व व वैशिष्ट्य** **९३**
**३. देवपूजेची मर्यादा व शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी पुढील टप्प्याची साधना आवश्यक** **९५**
**४. देवतांचे विडंबन रोखणे, ही काळानुसार आवश्यक अशी देवतेची उपासना !** **९६**

**– प्रस्तूत ग्रंथाविषयीचे सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान** **९७**

## मनोगत

हिंदु धर्मातील सगुण उपासनापद्धतीचा पाया म्हणजे ‘देवपूजा’. ‘नित्याच्या धावपळीच्या दिनक्रमात देवपूजेसाठी एवढा वेळ आहे कोणाला ?’, अशी नकारात्मक मानसिकता हल्ली बऱ्याच जणांमध्ये आढळते. केवळ एक नित्यकर्म पार पाडायचे म्हणून देवावर भरभर पाणी घालून गंधाचा टिळा लावायचा व कोणतेतरी फूल वाहून उदबत्तीने ओवाळायचे आणि ‘देवपूजा झाली’, अशी स्वतःची समजूत करून घ्यायची, असे चित्र आज दिसून येते. सर्वांच्या पालनपोषणाची काळजी वहाणाऱ्या भगवंताची पूजा अशा प्रकारे ‘उरकणे’, याला देवपूजा म्हणता येईल का ? असे केल्यावर भगवंताने आपल्यावर कृपा तरी का करावी ? घरी येणाऱ्या अतिथीचे स्वागत जसे आपण आदरपूर्वक करतो, तसेच देवाचे केले, म्हणजेच देवाची यथासांग पूजा केली, तरच तो आपल्यावर प्रसन्न होऊन आपल्याला भरभरून आशीर्वाद देतो. यासाठीच धर्मशास्त्रात देवाचे आवाहन करणे, त्याला बसण्यासाठी आसन देणे, त्याला चरण धुण्यासाठी पाणी देणे यांसारखे क्रमवार सोळा उपचार शिकवून त्या माध्यमातून विधीवत भावपूर्ण धर्माचरण करण्यास शिकवले आहे. १६ उपचारांपैकी पुढील उपचार – ९. गंध लावणे, १०. फूल वाहणे, ११. धूप दाखवणे, १२. दीप ओवाळणे व १३. नैवेद्य दाखवणे, या पाच उपचारांना ‘पंचोपचार’ असे म्हणतात. सोळा उपचारांद्वारे देवपूजा करणे शक्य नसल्यास पाच उपचारांनी केली तरी चालते. बऱ्याच जणांना षोडशोपचारे पूजा करणे शक्य होत नसल्याने त्यांना पंचोपचार पूजेची माहिती पहाणे सोपे जावे, यासाठी ग्रंथात आधी पंचोपचार व नंतर षोडशोपचार पूजनाची माहिती दिली आहे.

आपल्या त्रिकालदर्शी ऋषीमुनींनी धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे देवपूजा केल्यासच त्यांच्या संकल्पशक्तीचा आपल्याला लाभ मिळतो. ध्वपूजा धर्मशास्त्रानुसार करतांनाच भक्तीभावासह करणेही तितकेच महत्त्वाचे असते. देवपूजेत भगवंताविषयीच्या प्रेमाचा, भावाचा ओलावा नसेल, तर ती पूजा भगवंतापर्यंत पोहोचत नाही; कारण भगवंत भावाचा भुकेला आहे. सर्वसामान्य भाविकात भाव अकस्मात निर्माण होणे कठीण असते; पण देवपूजेतील विविध कृतींमागील शास्त्र समजून घेतल्यास देवपूजेविषयी, पर्यायाने देवाविषयी श्रद्धा निर्माण होऊन त्याचे रूपांतर भावात व्हायला साहाय्य होते. यासाठी ग्रंथात प्रामुख्याने देवपूजेतील कृतींमागील अध्यात्मशास्त्र सांगण्यावर भर दिला आहे.

देवतेचे आवाहन करतांना मूर्तीवर अक्षता किंवा तुळशीदल का वहावे, अर्घ्य देतांना पाण्याबरोबर गंध, पुष्प व अक्षता का वहातात, देवाला अभिषेक करतांना सुगंधी द्रव्याचा वापर का करावा, देवाला प्रथम गंध लावून नंतर हळद-कुंकू का वहावे, देवाला नैवेद्य दाखवतांना नैवेद्याचे पान कसे ठेवावे इत्यादी अनेक प्रश्नांची बुद्धीपलीकडील शास्त्रीय उत्तरे या ग्रंथात दिली आहेत.

थ्ह्याचबरोबर कोणत्या देवतेला कोणती फुले वहावीत, देवतांना फुले वहातांना ती विशिष्ट संख्येत व रचनेत वहाण्यामागचे शास्त्र काय, देवतेला किती उदबत्त्यांनी ओवाळावे यांसारख्या नाविन्यपूर्ण ज्ञानाचाही समावेश ग्रंथात केला आहे.

धार्मिक विधींत असलेली इतकी शास्त्रशुद्ध गहनता हिंदु धर्माशिवाय अन्य कोणत्याही पंथात नाही. यावरूनच हिंदु धर्माचे निर्विवाद श्रेष्ठत्व लक्षात येते.

ग्रंथात दिलेले शास्त्र समजून घेऊन त्यानुसार सर्वांकडून देवपूजा भावपूर्णरीत्या घडो व त्याद्वारे त्यांना अधिकाधिक ईश्वराचा कृपाप्रसाद लाभो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. **– संकलक**

**टीप :** ग्रंथात बर्‍याच ठिकाणी ‘प.पू. डॉक्टर’ किंवा ‘प.पू. डॉ. आठवले’ असा उल्लेख आला आहे, तो ग्रंथाच्या संकलकांपैकी ‘प.पू. डॉ. जयंत बाळाजी आठवले’ यांच्याविषयी आहे.